


# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक ७६, मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# ईव्हिएमच्या जोरावरचा विजय टिकत नसतो !

## ■ खा. नीलेश लंके यांचा विरोधकांना टोला ■ पारनेर बस स्थानकाचे भूमिपूजन संपन्न

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभेचा निकाल कसा लागला आहे हे सर्वांना माहीती आहे. पूर्वी राजकीय लोक ईव्हीएमवर संशय घेत होते. आज शेतामधील भगिनीही ईव्हिएमवर अविश्वास व्यक्त करत आहे. राज्यात सरकार आल्यावर वेगळा उत्साह असतो तो दिसला का असा प्रश्न उपस्थित करत ईव्हीएमच्या जोरावरील विजय टिकणारा नसतो.ज्यांनी निवडणूक सोडली त्यांच्या तोंडात या निवडणूकीत जांभुळ पडल्याचे सांगत खा. नीलेश लंके यांनी विरोधकांवर तोफ डागली.**

पारनेर बसस्थानकाच्या २ कोटी ६६ लाख रूपये खर्चाच्या कामाचे खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी या कामाचे श्रेय घेणाऱ्या विरोधकांवर खा. लंके यांनी शरसंधान केले. तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी रोहोकाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, बस स्थानकाच्या कामाचे कोणी श्रेय घेतले तर जनतेला ते कसे पटेल ? दुसऱ्याच्या झेंड्यावर आम्ही पंढरपूर करत नाही. विरोधक काल म्हणू लागले काम आम्ही आणले. विकास कामांसाठी ठराविक प्रक्रिया असते त्यासाठी मी सन २०२० पासून पाठपुरावा केला आज या कामाचे भूमिपूजन करताना आनंद होत असल्याचे सांगतानाच खासदार नीलेश लंके यांनी विरोधकांना टोला लगावला.

खा. लंके म्हणाले, आमदार म्हणून मी सकारात्मक काम केले त्यामुळेच हजारो कोटी रूपयांची विकास कामे मार्गी लागली आहेत. त्यामुळेच तालुका विकासात अग्रेसर असल्याचे चित्र आहे. मतदारसंघात मी प्रामाणिक काम केले म्हणूनच मतदारांनी मला लोकसभेत पाठविल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

खा. लंके म्हणाले, पारनेर बसस्थानकाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. मी आमदार झाल्यापासून बसस्थानकासाठी माझा पाठपुरावा सुरू होता. आज या कामाचा शुभारंभ होतोय याचा आनंद आहे. नव्या बसस्थानकामुळे पारनेरचा चेहरा मोहरा बदलणार आहे.
यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे,माजी सभापती गंगाराम बेलकर,सुदाम पवार, नगराध्यक्ष नितीन अडसूळ, उपनगराध्यक्षा जायदा शेख,खंडू भूकन, डॉ.बाळासाहेब कावरे, बाजार समितीचे संचालक बापू शिर्के,किसन सुपेकर, किसनराव रासकर, अँड. राहुल झावरे,
नितीन आडसुळ,जायदा शेख,सुरेखा भालेकर,प्रियंका ओटी,विद्या कावरे,प्रियंका ओटी,सुप्रिया शिंदे,निता ठुबे,हिमानी नगरे,प्रियंका खिलारी,दिपाली ओटी,वेजयंता मते,पुनम मुंगसे,भूषण शेलार,मंगेश ओटी,शुभम देशमुख, योगेश मते ,राजू शेख,बाळासाहेब नगरे,बाळासाहेब कावरे,विजय डोळ,सुभाष शिंदे,सचिन ओटी,विजय भास्कर ओटी,ऋषिकेश गंधाडे,सादिक राजे,अमित जाधव,दिपक नाईक,दगडू शेरकर,अशोक गायकवाड,बंडू गायकवाड,भाऊ ठुबे,सचिन पठारे, कारभारी पोटघन, अनिल गंधाक्ते, भाऊ निवडूगे, राजेश चेडे,आनंदा ओटी,विलास सोबले,दादा शेटे,राजेंद्र शेरकर,अजिम शेख,महेंद्र मगर,निवृत्ती मते,सुभाष मते,कुमार देशमुख,अंकुश शेरकर,सचिन नगरे,पोपट घोडके,दगडू कावरे,रामदास पठारे,अर्जुन मते,रायभान ओटी,केलास घोडके,बलभिम कुबडे,बबन चोधरी,दिपक पठारे,अशोक कावरे,बाबा पठारे,विजय तराळ, संदीप मते,भाऊसाहेब रासकर,भरत ओटी,भाऊसाहेब औटी उपस्थित होते.

### उशिराबद्दल दिलगिरी

बस स्थानकाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम सकाळी दहा वाजता होता. मात्र खा. लंके हे दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कार्यक्रमस्थळी पोहचले. उशीर झाल्याबद्दल दिलगीरी व्यक्त करत ते म्हणाले, आठ दिवस संसदेच्या अधिवेशनानिमित्त मी दिल्लीत होतो. त्यामुळे आठ दिवसांचा बॅकलॉग होता. हंगे येथे कामे घेवून लांबून शेकडो लोक आले होते. प्रत्येकाचे काम मार्गी लावण्याचा प्रयत्न असल्याने कार्यक्रमास येण्यास उशीर झाल्याचा खुलासा खा. लंके यांनी केला.

### ५०० दिव्यांगांना पायावर उभे करणार

समाजातील दुर्लक्षीत घटकांसाठी काही केले पाहीजे यासाठी नीलेश लंके प्रतिष्ठान काम करते. दिव्यांग संघटनेचे सुनिल करंजुले यांच्या संकल्पनेतून दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी एक योजना हाती घेण्यात आली आहे. शासन दिव्यांगांना हजार-दिड हजारांची मदत करते. आमच्या योजनेतून दिव्यांग बांधव स्वतःच्या पायावर उभे करण्यात येणार आहे. वर्षभरात ५०० दिव्यांगाना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे उद्दीष्ट असल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले.

### १६ हजार रूग्णांना मोफत चष्मे

शरद पवार यांच्या वाढदिवसापासून सुरू करण्यात आलेल्या मोती बिंदू तपासणी शिबिरात २१ हजार रूग्णांचे डोळे तपासण्यात आले. त्यासाठी ६० लाख रूपयांची रूग्णवाहिका खरेदी करण्यात आली असून त्यात अत्याधुनिक मशिनरी आहे. गावागावात ही रूग्णवाहिका पोहचली त्यामाध्यमातून रूग्णांची तपासणी करण्यात आली.१६ हजार रूग्णांना चष्मे वाटप करण्यात आल्याचे खा. लंके म्हणाले.

### निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनसाठी पाठपुरावा

सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे निमसरकारी कर्मचाऱ्यांनाही पेन्शन मिळाली पाहिजे. त्यासंदर्भात शरद पवार यांच्या माध्यमातून अर्थमंत्री निर्मला सितारमण यांची भेट घेणार आहोत. आरोग्य तसेच पत्नीच्या पेन्शनबाबातही मागणी करणार असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.



### नि:स्वार्थ भावनेतून काम

अनेक लोक निवडणूका आल्यावर शिबिरे घेतात. निवडणूक होण्यापूर्वी त्यांच्या शिबिरात दिलेले चष्मे तुटून जातात.आम्ही दिलेले चष्मे दर्जेदार आहेत. शिबिरात मोतीबिंदूचे निदान झाल्यानंतर १ हजार रुग्णांवर पुण्याच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मोती बिंदू शस्त्रक्रियेमध्ये २० हजार रूपयांची लेन्स बसविण्यात आल्या. आम्ही निस्वार्थ भावनेतून काम करतो. काही लोक राजकारणात दिखाऊपणासाठी काम करतात. निवडणूका आल्यावर भुछत्राप्रमाणे काम करतात. समाजाचे देणे लागतो या भावनेतून काम अपेक्षीत असते असे खा. लंके म्हणाले.

### सुर्य तळहाताने झाकता येत नाही

आंबेडकर भवनासाठी आम्ही अडीच कोटी रूपयांचा निधी मंजुर केला आहे. मात्र त्यात काहींनी खोडा घातला. सुर्य तळहाताने झाकता येत नाही असे सांगतानाच सत्ता सर्वसामान्यांसाठी वापरण्याची भूमिका असली पाहिजे असे खा. लंके यांनी सांगितले.

### काय होणार तालुक्याचे ?

सहा वर्षापासून खा. लंके यांचा बसस्थानकाच्या कामासाठी पाठपुरावा सुरू होता. असे असताना आ. दाते यांच्यामुळे हे काम मंजुर झाल्याच्या बातम्या छापून आल्या. या कामाचे वर्षापूर्वीच टेंडर मंजुर झालेले असताना आ. दाते यांचा या कामाशी काय संबंध ? खा.लंके यांच्या पाठपुराव्याचे आमच्याकडे पुरावे आहेत. भूमिपूजन जाहिर झाल्यानंतर अधिकाऱ्यांवर दबाव आणला गेला. काय होणार तालुक्याचे ? पाणी योजनेचे श्रेय घेण्याचा असाच प्रयत्न होईल. ही योजना कोणी आडविली हे सर्वश्रुत आहे. ही योजना खा. लंके हेच आणणार आहेत.

अर्जुन भालेकर
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### डायलेसीस व मॅमोग्राफी केंद्र सुरू करणार

रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केलेल्या दात्यांना साडेपाच लाख रूपयांची पॉलिसी देण्यात आली. गोरगरीबांना काही घटना झाल्यास मदत मिळावी ही भूमिका त्यामागे आहे. लवकरच मॅमोग्राफी व डायलेसीस सेंटर सुरू करण्याची योजना आहे. हे केंद्र सुरू झाल्यानंतर तालुक्यातील रूग्णांना त्याचा फायदा होणार असल्याचे खा. लंके म्हणाले.

### उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

दिल्ली येथे उद्योग मंत्र्यांना भेटलो. उद्योग विभागाच्या योजना समजुन घेतल्या. त्याचा अभ्यास केला. लवकरच उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे .३०० ते ३५० उद्योगांना ५० टक्क्यांपर्यंत केंद्र सरकार अनुदान देते. पाच कोटी रूपयांचे कर्ज मिळते. तरूणाच्या हाती उद्योग व्यवसाय दिला पाहिजे. यासाठी तरूणांनी या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन खा. नीलेश लंके यांनी केले.

### मला दिल्ली मिरवायला पाठविले नाही !

कांदा, दूध शेतमालाच्या प्रश्नावर आवाज उठविला. दूध प्रश्नावर आवाज उठविला. गेल्या आठवडयात सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ मिळावी यासाठी दिल्लीत मंत्र्यांना पत्र दिले आहे. सोमवारी दिल्लीत गेल्यानंतर या प्रश्नावर संसदेच्या पायरीवर आंदोलन करणार आहे. मुदतवाढ झाली नाही तर मलाच तुरूंगात डांबा अशी भूमिका मी घेणार आहे. मला तुम्ही दिल्ली मिरवायला नाही पाठविले तुमचे प्रश्न मांडण्यासाठी पाठविले असल्याचे खा. लंके म्हणाले.

### नॉन प्लॅन रस्ते पक्क्या रस्त्याने जोडायचेत

२०० लोकसंख्येवरील वस्त्यांचे नॉन प्लॅन रस्ते पक्क्या रस्त्याने जोडायची आहेत. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून त्यासाठी निधी आणण्याचा प्रयत्न आहे. गावोगावच्या कार्यकर्त्यांनी तसे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन लंके यांनी केले.

# डॉ.सुरेश शिंदेंची भूमिका असणारा 'साबर बोंड' सातासमुद्रापार !

■ आंतरराष्ट्रीय सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड
■ जगभरातील चित्रपटांशी करणार स्पर्धा



भाळवणी : सुदेश आबूज

**पारनेर तालुक्यातील सुपुत्रांनी आजपर्यंत कला, क्रीडा, प्रशासन अशा चौफेर क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आता पुन्हा एकदा पारनेरचे सुपुत्र डॉ. सुरेश शिंदे यांनी मध्यवर्ती भुमिका साकारलेल्या 'साबर बोंड' या मराठी चित्रपटाची आशिया खंडातील सर्वात नावाजलेल्या महत्त्वपूर्ण चित्रपट महोत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सनडान्स फिल्म फेस्टिवलमध्ये पहिल्यांदाच निवड झाली आहे. त्यातून पारनेरकरांची छाती अभिमानाने फुलून आली आहे.**

'साबर बोंड' ही महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरजवळील एका गावात घडलेली एक समलैंगिक प्रेमकथा आहे, ज्यामध्ये पारनेर तालुक्यातील माळकुप गावचे सुपुत्र डॉ. सुरेश शिंदे यांच्यासह भूषण मनोज, सूरज सुमन आणि जयश्री जगताप यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाचे इंग्रजी नाव 'कॅक्टस पिअर्स' आहे. ही कथा आनंद या ३० वर्षीय शहरात राहणाऱ्या तरुणाची आहे, ज्याला त्याच्या वडिलांच्या निधनानंतर १० दिवसांचा शोक साजरा करण्यासाठी पश्चिम भारतातील एका ग्रामीण भागात पाठवले जाते. इथे तो लग्न टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका स्थानिक शेतकऱ्याशी भावनिकरित्या जोडला जातो. या चित्रपटांची कथा प्रेक्षकांना खूप वेगळा अनुभव देणारी आहे.

या चित्रपटात डॉ. सुरेश शिंदे यांची महत्वपूर्ण भूमिका आहे. पहिल्यांदाच सनडान्स फेस्टिवल मध्ये आलेल्या या मराठी चित्रपटाला स्पेशल ज्युरी अवॉर्ड मिळाला आहे. भारतीय मराठी सिनेमासाठी त्यातली त्यात पारनेरांसाठी ही खूप अभिमानाची गोष्ट आहे. विशेष म्हणजे दे धमाल उर्वरीत पान ३ वर

# १५ फेब्रुवारीपासून कुकडीचे आवर्तन - आ. काशिनाथ दाते

पारनेर : प्रतिनिधी



**कुकडी डाव्या कालव्यातून उन्हाळी पीकांसाठी येत्या १५ फेब्रुवारीपासून आवर्तन सोडण्यात येणार असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.**

कुकडी प्रकल्पातील येडगांव धरणातून निघोज व परिसरातील १४ गावांना कालव्याद्वारे पाणी दिले जाते. डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्याच्या तारखा निश्चित करण्यात येत असून त्यानुसार हे आवर्तन २० फेब्रुवारी रोजी सोडण्यात येणार होते. मात्र पीकांना पाण्याची आवष्यकता असल्याने हे आवर्तन आगोदर सोडण्याची मागणी निघोज परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे केली होती.

उन्हाळयाच्या उर्वरीत पान ३ वर

# सेवानिवृत्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणार - खासदार नीलेश लंके

## राज्यातील ५२ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांचे नेतृत्व स्वीकारण्याची खासदार लंके यांना गळ

पारनेर : प्रतिनिधी

**एसटी तसेच विविध अस्थापनांमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली.प्रश्नांची सोडवणूक होईपर्यंत आपण स्वस्थ बसणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

राज्य परिवहन निवृत्त उर्वरीत पान ३ वर












# युवा

## प्री वेडिंग ताण

**लग्न हा कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. लग्नाच्या पवित्र बंधनात बांधले गेल्यावर दोन व्यक्तीच नाही तर दोन परिवार एकत्र येतात. आनंदाप्रमाणे जबाबदाऱ्याही येतात. अनेक लोक गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असतात. पण काही जण लग्नाच्या तणावात असतात. नवीन जबाबदारी आपण पार पाडू शकू की नाही ? अनेक लोकांमध्ये लग्नाबाबत सकारात्मक विचार आणि प्रश्न असतात यालाच प्री वेडिंग ताण असे म्हणतात. चला तर मग जाणून घेऊयात हे नक्की आहे तरी काय. लग्नाबद्दल चिंताग्रस्त होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. परंतु जेव्हा एखादी व्यक्ती लग्नाच्या तयारीची किंवा त्यानंतरच्या आयुष्याबद्दल खूप काळजी करू लागते तेव्हा तो चिंतेचा शिकार होतो. या चिंतेचे मुख्य कारण म्हणजे दोघांनाही लग्नानंतरच्या आयुष्याची काळजी वाटते. मग तो कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचा असतो. पण या गोष्टी योग्य पद्धतीने हाताळणे गरजेचे असते.**


- जोडीदारासोबत बोला : जर तुम्हाला लग्नाच्या तयारीबद्दल किंवा त्यानंतरच्या आयुष्याबद्दल खूप तणाव वाटत असेल, तर सर्वोत्तम पर्याय म्हणजे तुमच्या जोडीदारासोबत बसून त्याबद्दल बोलणे. तुम्हा दोघांनी तुमचे आयुष्य एकत्र घालवायचे आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच तुम्ही या गोष्टीची तयारी करणे गरजेचे आहे.
- परिस्थिती स्वीकारा : आयुष्याच्या प्रत्येक स्तरावर ताण आणि संकट येतात. त्यामुळे तुमचा तणाव कमी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे परिस्थितीचा स्वीकार करणे. यासह, आपण भविष्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होऊ शकाल आणि चिंता टाळू शकाल. ज्या गोष्टीचा तुम्ही जास्त विचार कराल तेवढा तुम्हाला त्रास होईल.
- मित्राची मदत घेऊ शकता : आपल्या सर्वांच्या आयुष्यात असा मित्र असतो, ज्याच्याशी बोलणे आपल्याला हलके किंवा चांगले वाटते. अशा परिस्थितीतही तुम्ही तुमच्या मित्राशी बोलून तणाव कमी करू शकता. याकाळात मित्र तुम्हाला खूप चांगली मदत करू शकतात.
- काही महिने आधीच तयारी सुरू करा : लग्नाची तयारी जर तुम्ही काही महिन्यांआधीपासून सुरू केली तर तुम्हाला कमी त्रास होईल. ड्रेस, ॲक्सेसरीज किंवा इतर गोष्टींबाबत शेवटपर्यंत तयार नसतात. तो सतत या गोष्टीचा विचार करतो, ज्यामुळे तो तणावग्रस्त होऊ लागतो. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या पोशाखाची तयारी काही महिने आधीच करून घेणे आणि तणावमुक्त राहणे चांगले.
- परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करू नका : प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही कमतरता नक्कीच असते. एक व्यक्ती कलेत तर दुसरी नृत्यात चांगली असू शकते. म्हणून लक्षात ठेवा की तुम्ही प्रत्येक गोष्टीत परिपूर्ण होऊ शकत नाही. परिस्थिती समजून घेऊन शांततेने पुढे जा. ज्या गोष्टी जशा आहेत तशा स्विकारा. यामुळे तुम्हाला फायदा होईल.





## तुमचा जोडीदार मनोरुग्णासारखे वागतोय?

**तुम्ही मनोरुग्ण हा शब्द अनेक वेळा ऐकला असेल. गुन्ह्यांशी संबंधित बातम्यांमध्ये याचा उल्लेख अनेकदा केला जातो. पण तुम्ही कधी तुमच्या वैयक्तिक आयुष्यात या शब्दाबद्दल विचार केला आहे का ? जर नसेल, तर तुमच्या जोडीदाराच्या या ५ सवयींवरून तो मनोरुग्ण आहे की नाही ते ओळखा...**



कोणत्याही नात्यात परस्पर प्रेम, विश्वास आणि आदर असणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्हाला वाटत असेल की तुमच्या नात्यात सर्व काही बरोबर नाहीये आणि काहीतरी चूक होत आहे. विश्वासाऐवजी प्रत्येक छोट्या गोष्टीवरून हेराफेरी, मारामारी आणि आक्रमकता निर्माण होऊ लागली, समजून घेण्याऐवजी प्रत्येक गोष्टीबद्दल प्रश्न पडू लागले तर तुम्ही सावध राहिले पाहिजे. नात्यातील धोक्यांकडे लक्ष दिले पाहिजे. दुर्लक्ष करण्याऐवजी, आपण ते काय आहे ते समजून घेतले पाहिजे...

तुमचा जोडीदार मनोरुग्णासारखा वागत आहे का हे तुम्हाला माहित असणे आवश्यक आहे. हे समजून घेण्यासाठी, तुम्हाला प्रथम मनोरुग्णांबद्दल जाणून घ्यावे लागेल आणि त्यांच्या सवयी देखील समजून घ्याव्या लागतील. तरच तुम्ही तुमच्या जोडीदाराला समजून घेऊ शकाल. गुन्हेगारीच्या जगात या सर्वात प्रसिद्ध शब्दाचा नातेसंबंधांवर खूप मोठा प्रभाव पडतो. म्हणून, वेळीच समजून घ्या आणि तुमच्या जोडीदाराच्या सवयी लक्षात घ्या.

- कधीही पश्चात्ताप होत नाही : मनोरुग्ण कोणालाही दुखवू शकतात, त्यांना त्यांच्या कृत्यांबद्दल कधीही थोडासाही पश्चात्ताप होत नाही. नुकसान आर्थिक असो, भावना दुखावल्या असो किंवा शारीरिक दुखापत असो. त्यांना अजिबात सहानुभूती नाही. अशा परिस्थितीत, जर तुमच्या जोडीदाराला कळूनही त्याची चूक कळत नसेल किंवा तुम्हाला दुखावल्याबद्दल त्याला पश्चात्ताप नसेल, तर तुम्ही त्याची ही सवय लक्षात घेतली पाहिजे.
- मन जिंकण्यासाठी कॉपी करा : सायकोपॅथ्स अँड लव्हच्या लेखिका ॲडेलिन बर्च यांच्या मते, मनोरुग्ण त्यांच्या जोडीदारांची मने जिंकण्यासाठी त्यांचे अनुकरण करू लागतात. तो अगदी तुमच्यासारखाच बनतो, जणू काही त्याला तुमच्यासारख्याच आवडीनिवडी आहेत. असे करून तो तुमच्या नजरेत एक परिपूर्ण व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करतो. पण, त्यांना मत्सर आणि संशयाच्या भावना असतात आणि ते तुमच्यावर नियंत्रण ठेवू इच्छितात.
- मनोरुग्णांना कमी मित्र असतात : मनोरुग्ण फक्त स्वतःचा आणि स्वतःच्या फायद्याचा विचार करतात, म्हणून ते इतर कोणाशीही जुळवून घेत नाहीत आणि त्यांना जास्त मित्रही नसतात. त्यांच्यासाठी दीर्घ आणि निरोगी नातेसंबंध टिकवणे कठीण आहे. इतरांवर अधिकार हवा असल्याने कोणासोबतही एकत्र काम करू शकत नाही. स्वतःच्या फायद्यासाठी ते त्यांच्या जोडीदारांशी खोटे बोलतात आणि त्यांना दुखावतात.
- ओळखणे थोडे कठीण आहे : मनोरुग्णांना ओळखणे कठीण असते. खरंतर हे लोक इतरांची मने कशी जिंकायची हे जाणतात आणि खोटी सहानुभूती दाखवण्यातही तज्ञ असतात. त्यांची खासियत अशी आहे की त्यांच्याशी बोलणाऱ्या व्यक्तीला ती व्यक्ती किती धोकादायक आहे हे समजू शकणार नाही. त्यांचे व्यक्तिमत्व सर्वांना आवडते आणि ते बुद्धिमान दिसू शकतात. तथापि, जेव्हा तुम्हाला लाल झेंडे दिसतात तेव्हा तुम्ही सतर्क राहिले पाहिजे आणि जास्त विश्वास ठेवू नये. तसेच, विषारी संबंध टाळण्याचे मार्ग शोधले पाहिजेत.

## मोठमोठ्या बाता अन्...



**प्रेमात पडल्यानंतर माणसाचे जग बदलते. तो वास्तवापेक्षा कल्पनेत जास्त जगू लागतो. आज काय घडत आहे यापेक्षा, उद्या किती सुंदर असेल यावर लक्ष केंद्रित करायला सुरुवात होते. याच काळात जोडीदार त्यांच्या आयुष्याचे नियोजन करतात आणि एकत्र पुढे जाण्याचे स्वप्न पाहतात. मुलाला जन्म देण्यापासून ते एकत्र म्हातारे होण्यापर्यंत, आपले अर्धे आयुष्य कल्पनांमध्ये जगलेले असते. पण जेव्हा ही आश्वासने प्रत्यक्षात नसून केवळ खोटे बोलून दाखवली जातात तेव्हा काय होते ? ही एक सुनियोजित रणनीती असू शकते, जी जोडीदारावर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा वचनाच्या नावाखाली त्याच्याकडून काहीतरी मिळवण्यासाठी वापरली जाते. अशा परिस्थितीत, तुमचा जोडीदार खरे आश्वासन देत आहे की खोटे हे जाणून घेण्यासाठी, तुम्हाला भविष्यातील खोट्या गोष्टींबद्दल सर्वकाही माहित असले पाहिजे...**

### अशा प्रकारे ओळखा

सर्वप्रथम, प्रत्येकाने नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी थोडा वेळ काढला पाहिजे; एखाद्याच्या गोड बोलण्यात आणि प्रेमाच्या जाळ्यात अडकून सर्वकाही पणाला लावू नये. भावनिक बाबींमध्ये अडकून कोणत्याही नात्यात येण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. जसे, की पहिल्याच डेटवर भावनिक गोष्टींबद्दल बोला. ती वचन देते आणि नंतर सबबी सांगून वचने मोडते, फायदा जसे की पैसे उकळण्याचा प्रयत्न करते. स्वप्ने दाखवते. स्वतःबद्दल पूर्ण माहिती देत नाही. तुमची कोणालाही ओळख करून देत नाही.

### हेतू लपविण्यासाठी...

तज्ञांचा असा विश्वास आहे की भविष्यातील बनावटी कामे करणारे लोक आत्मकेंद्रित असतात. बरेचदा, खरे हेतू लपविण्यासाठी आणि फसवे संबंध प्रस्थापित करण्यासाठी भविष्यातील बनावटगिरी केली जाते. काही लोक त्यांची मजबूत प्रतिमा निर्माण करण्यासाठी याचा अवलंब करतात. अनेकदा ज्या लोकांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव असतो आणि ज्यांच्याकडे देण्यासाठी काही खास नसते ते खोट्या आश्वासनांनी प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात.

### कसे टाळावे.. ?

नातेसंबंधात होत असलेले कोणतेही बदल समजून घेण्यासाठी तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. आश्वासनांच्या स्थितीत बदल किंवा त्यांची पूर्तता न होणे हे लक्षात घेतले पाहिजे. तुमच्या जोडीदाराने दिलेल्या आश्वासनांची सत्यता तुम्ही तपासली पाहिजे, जर त्याचे काम आणि आश्वासने जुळत नसतील तर त्याबद्दल बोला. कोणत्याही परिस्थितीत तुमच्या आरोग्याशी आणि आनंदाशी तडजोड करू नका.

### बनावटीपणा म्हणजे काय ?



भविष्यातील बनावटगिरी ही मानसिक फसवणुकीचा एक प्रकार म्हणून समजली जाऊ शकते. वर्तमानात काहीतरी साध्य करण्यासाठी, असे लोक भविष्यात तुमच्या इच्छा पूर्ण करण्याचे वचन देतात. तथापि, भविष्यातील बनावटगिरी केवळ नातेसंबंधांमध्येच नाही तर इतर ठिकाणी देखील घडते. हे खोटे बोलण्यापेक्षा खूप पुढे जाते, कारण त्यात तुमचे भविष्य गुंतलेले असते. भविष्यात बनावटगिरीला बळी पडणारी व्यक्ती मानसिकदृष्ट्या खचते, लोकांवर विश्वास ठेवू शकत नाही आणि नैराश्यात जाते. म्हणूनच भविष्यातील बनावटपणा ओळखणे खूप महत्वाचे आहे, जे सोप्या शब्दात सांगायचे तर खोटे आश्वासन आहे.

## नॅनोशिप... ही काय भानगड आता?

**डेटिंगचे जग खूप वेगाने बदलत आहे. वर्ष बदलत असताना, डेटिंग ट्रेंड देखील बदलू लागले आहेत. नॅनोशिप सध्या खूप वेगाने ट्रेंड होत असले तरी, त्याचा अर्थ नावातच लपलेला आहे. अर्थ कळल्यानंतर तुम्ही स्वतः विचार कराल की हे काय चालले आहे...**

एक काळ असा होता जेव्हा नात्यांमध्ये शपथा आणि आश्वासनांना खूप महत्त्व होते. ७ फेऱ्या मारून, ७ आयुष्य एकत्र राहण्याचे वचन देण्यात आले. पण आता जग पूर्णपणे बदलले आहे, कदाचित इथे आश्वासनांना जागा नाही. सोशल मीडियावर लोकप्रिय होत असलेला नवीन ट्रेंड हे याचे एक उदाहरण आहे. बरं, नवीन पिढीसाठी, ज्यांना जनरेशन झेड म्हणूनही ओळखले जाते, त्यांचे डेटिंग हे ९० च्या



दशकातील प्रेमापेक्षा खूप वेगळे आहे. हे आतापर्यंत सर्वांना समजले असेलच. आता सिच्युएशनशिप नंतर, नॅनोशिप त्यांच्या डेटिंग डिक्शनरीमध्ये दाखल झाला आहे. नॅनोशिप या नवीन डेटिंग टर्मच्या नावात एक अर्थ लपलेला आहे, जो ९० च्या दशकातील लोकांना आश्चर्यचकित करू शकतो.

### नॅनोशिप म्हणजे काय ?

नॅनोशिप हे त्याच्या नावावरून समजू शकते, जे दोन शब्दांपासून बनले आहे. पहिला नॅनो-दुसरा शिप, इथे नॅनो म्हणजे खूप लहान आणि शिप म्हणजे नाते. तुम्ही याला एक छोटेसे प्रेमसंबंध म्हणू शकता. अशी गोष्ट जी थोड्या काळासाठी टिकते आणि सुरुवात होताच संपते. हे काही मिनिटे, तास किंवा दिवसांसाठी असू शकते.

### कनेक्शन कसे आहे ?

तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, नॅनोशिप खूप लहान आहे. भविष्यात ते गंभीर होण्याची आशा नाही. या नात्याचा कालावधी खूपच कमी आहे, एका उदाहरणाने ते समजून घेणे तुमच्यासाठी सोपे होईल. एखाद्या पार्टी, मेट्रो किंवा ऑफिसच्या कार्यक्रमाप्रमाणे, जेव्हा दोन लोकांचे डोळे भेटतात तेव्हा हृदयात काहीतरी घडते. ते थोड्या गप्पा मारतात आणि प्रेमसंबंधही निर्माण होतात. पण दोघांपैकी कोणीही हे नाते पुढे नेण्याचा विचार करत नाही, जे सुरू होताच संपते. याला नॅनोशिप म्हणतात.

### वर्तमानात जगा

नॅनोशिपना भविष्याची अजिबात पर्वा नाही. येथे प्रेमाच्या भावना निर्माण होऊ शकतात पण ते प्रेमापेक्षा आकर्षणाचे जास्त मानले जाते. जोडप्यांमध्ये भावनिक किंवा शारीरिक बंध नसतो. भावनिक बंधनाच्या अभावामुळे हे नाते जास्त काळ टिकत नाही.

## मुलींना दाढी असलेले पुरुष का आवडतात?

**या जगात पूर्वी बहुतेक पुरुष दाढी ठेवणे पसंत करायचे. पण काळ बदलला तसतसे ते क्लिन-शेव्ह दिसू लागले. आता पुन्हा एकदा लोकांमध्ये दाढी ठेवण्याचा ट्रेंड वाढला आहे. तथापि, दाढी ठेवावी की क्लीन-शेव्हन राहावे याबद्दल अजूनही गोंधळ आहे. दोन्ही लूकचे स्वतःचे युक्तिवाद आहेत. हॉलिवूड किंवा बॉलिवूडमधील नायक बहुतेकदा क्लीन शेव्हमध्ये दिसतात, परंतु आजकाल KGF सारखे चित्रपट प्रदर्शित झाल्यामुळे, दाढीचा लूक मुलींची पसंती बनला आहे. तुम्हाला वाटत असेल की दाढी ठेवल्याने मुले सुंदर दिसतात, म्हणूनच मुलींना ते आवडतात. तसे असेलही पण त्यापेक्षा आणखी वेगळे कारण आहे.**



### संशोधन काय म्हणते ?


अहवालानुसार, दाढी असलेले पुरुष नवीन जोडीदार शोधत नाहीत. त्यांच्याकडे जे काही आहे त्यावर ते समाधानी असतात, तर क्लीन-शेव्हन पुरुष अधिक 'सोबती शोधणारे' असतात. म्हणूनच मुली या क्लीन शेव्हन पुरुषांपेक्षा दाढी असलेल्या पुरुषांवर जास्त विश्वास ठेवतात.

### किती लोकांचा अभ्यास ?

या अभ्यासात १८ ते ४० वयोगटातील ४१४ पुरुषांचा समावेश होता आणि त्यांच्या 'चेहऱ्यावरील वाढत्या केसांचा प्रभाव' जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. असे आढळून आले की ज्या पुरुषांच्या चेहऱ्यावर जास्त केस असतात त्यांच्यात प्रेमसंबंध आणि कौटुंबिक संबंध निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. ते त्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे ही त्यांची जबाबदारी मानतात.

### म्हणूच दाढी असलेले खास

या अभ्यासात असेही दिसून आले आहे की चेहऱ्यावरील अतिरिक्त केस स्वच्छ आणि देखभालीसाठी खूप प्रयत्न करावे लागतात. दररोज चेहऱ्यावरील केसांची काळजी घेण्यासाठी वेळ, मेहनत आणि संसाधने लागतात. अशाप्रकारे, चेहऱ्यावरील वाढत्या केसांचा ठसा लोकांना लोकांसमोर वेगळे आणि जबाबदार दिसण्यास मदत करतो.



## शॉर्ट न्यूज

### नगरमध्ये संत्र्याची सर्वाधिक आवक

**नगर :** येथील दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीत फळांची आवक झाली. फळांमध्ये डाळिंबाला २४ हजार सर्वाधिक भाव मिळाला. येथील बाजार समितीच्या आवारात राज्याच्या विविध भागातून फळांची चांगली आवक होत आहे. मोसंबी, संत्रा, डाळिंब, अननस, अंजीर, किवी, पिअर, द्राक्ष, चिकू, ड्रॅगन फ्रुट आदी फळांची आवक झाली होती. संत्र्यांची सर्वाधिक २७४. ९१ आवक झाली होती. संत्र्याला कमीत कमी एक हजार रुपयांचा, तर जास्तीत जास्त सहा हजार रुपयांचा भाव मिळाला. संत्र्याला सरासरी ३ हजार ५०० क्विंटलचा भाव मिळाला.

### अनैतिक संबंधातून मुलाचा खून

**कोपरगाव :** चासनळी परिसरात २० डिसेंबर रोजी गोदावरी नदीपात्रात पाच वर्षीय मुलाचा मृतदेह आढळून आला होता. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या चिमुकल्याचा खून झाल्याचे उघड झाले. प्रेमसंबंधात अडथळा निर्माण होत असल्याने आई आणि तिच्या प्रियकराने मिळून मुलाचा खून केल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. तालुका पोलिसांनी या दोघांना अटक केली आहे. आरोपी शीतल ज्ञानेश्वर बदादे आणि तिचा प्रियकर सागर शिवाजी वाघ यांनी अनैतिक संबंधात आड येत असल्याने कार्तिकचा निर्दयपणे काटा काढण्याचा कट रचला.

### घोडेगावात कांदा तीन हजारापर्यंत

**नेवासा :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव कांदा मार्केटमध्ये काल शनिवारच्या लिलावासाठी १३ हजार ९७१ गोण्या कांद्याची आवक झाली. भाव जास्तीत जास्त तीन हजारार्पत निघाले. एक नंबरच्या कांद्याला २८०० ते ३००० रुपये भाव मिळाला. दोन नंबर २६०० ते २७०० रुपये, तीन नंबर २४०० ते २५०० रुपये, गोल्टा १७०० ते २१०० रुपये, गोटी १२०० ते १५०० रुपये तर हलक्या डॅमेज व जोड कांद्याला ५०० ते १००० रुपयांपर्यंत भाव मिळाला. अपवादात्मक भाव ३००० ते ३२०० रुपये मिळाला.

### श्रीगोंद्यात राहुल सोलापूरकर यांचा निषेध

**श्रीगोंदा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत संभाजी ब्रिगेडच्या वतीने जोधपूर मारुती चौकात निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमेचे दहन करून संतप्त शिवप्रेमींनी आपला तीव्र रोष व्यक्त केला. राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवराय आग्र्याहून सुटताना लाच देऊन सुटल्याचे घाणेरडे विधान केले होते. या वक्तव्यामुळे शिवप्रेमी आणि संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

### संगमनेर शहरात मटका व्यवसाय जोरात

**संगमनेर :** शहरातील गल्लीबोळात अवैधरित्या मटका व्यवसाय जोरात सुरू असून सुगीचे दिवस आल्याचे पाहावयास मिळत आहे. मात्र याकडे संगमनेर शहर पोलिसांनी दुर्लक्ष केले आहे. यावरून त्यांना नेमका कोणाचा आशीर्वाद मिळतोय, असा प्रश्न जनतेला पडला आहे. शहरात सर्रासपणे अवैध धंदे सुरू आहेत. यामध्ये मटका व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. असे असतानाही शहर पोलीस त्यांच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. कारवाई झाल्याचे सध्या तरी ऐकीवात नाही.

# हवेत गोळीबार करणारे तिघे जेरबंद

## एलसीबीच्या पथकाची कारवाई



**शिर्डी : प्रतिनिधी**

**शिर्डी परिसरात हवेत गोळीबार करून दहशत पसरविणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. त्यांच्याकडून २ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.**

गणेश आप्पासाहेब शेजवळ, अजय रत्नाकर शेजवळ, भाऊसाहेब साहेबराव जगताप (सर्व रा, शिर्डी, ता. राहाता) असे ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. याबाबत त्यांनापुढील तपासासाठी शिर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. शिर्डी परिसरात हवेत गोळीबार करून दहशत पसरवणारा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार गणेश शेजवळ हा दहशत पसरवत असल्याचे समजले. त्यानुसार गुन्हे शोध पथकाने त्याचा शोध घेतला असता त्याने त्याच्या चुलत भावाकडे गावठी कट्टा ठेवला, असे तपासत समोर आले. पथकाने अजय शेजवळ याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३ गावठी कट्टे, ३ जिवंत काडतुसे व ३ रिकामी काडतुसे हस्तगत करण्यात आली.

# राहुल सोलापूरकरचे तोंड फोडा १ लाख मिळवा!

## जिथे दिसेल तिथे तोंड रंगवा । ठाकरे गटाच्या शरद कोळींची घोषणा

**सोलापूर : प्रतिनिधी**

**अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्रा सुटकेच्या विषयावर बोलताना वादग्रस्त विधान केले होते. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यावरून पेटाऱ्यातून नव्हे तर लाच देऊन सुटले होते, असे वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केले होते. यामुळे त्यांच्यावर सर्वच स्तरातून टीका केली जात आहे. तसेच राहुल सोलापूरकरचे तोंड फोडा आणि १ लाख बक्षीस मिळवा, अशी घोषणाच ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी केली आहे.**

शरद कोळी म्हणाले, शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या सोलापूरकरला फोडून काढा. राहुल सोलापूर जिथे दिसेल तिथे त्याचे तोंड चपलीने रंगवणाऱ्या व्यक्तीला १ लाखाचे



बक्षीस मी जाहीर करत आहे, अशी घोषणाच त्यांनी केली आहे.

**राहुल सोलापूरकर काय म्हणाले होते?**

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटले, मिठाईचे पेटारे-बिटारे काही नव्हते. चक्क लाच देऊन महाराज आले आणि त्यासाठी किती हुंडा वटवल्या आहेत, याचेसुद्धा पुरावे आहेत. अगदी औरंगजेबाच्या वजिराला आणि त्याच्या बायकोलासुद्धा महाराजांनी लाच दिलेली आहे. मोहसिन खान का मोईन खान नाव आहे बहुतेक त्याचे.. त्याच्याकडून अधिकृत शिक्क्याचे परवाने घेऊन सगळे बाहेर पडलेत. स्वामी परमानंद पाच हत्ती घेऊन शेवटचे गेले, त्याच्या परवान्याची अजूनही खूण आहे. लोकांना गोष्टी रुपात सांगताना काहीतरी रंजक करून सांगावे लागते. मग ती रंजकता आली की इतिहासाला छेद दिला जातो किंवा बाजूला टाकला जातो, असे ते एका मुलाखतीत म्हणाले होते.

राहुल सोलापूरकर यांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व आमदार अमोल मिटकरी यांनी देखील टीका केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यातुन स्वकर्तुत्वावर निसटले हा इतिहास महाराष्ट्राच्या मनामनात कोरलेला असताना जाणीवपूर्वक राहुल सोलापुरकर याने छत्रपती शिवरायांची बदनामी करण्याची एक चाल खेळली आहे. याबाबत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी अमोल मिटकरी यांनी केली आहे.


# विहिरीत पडलेल्या बिबट्याला पाच तासांनंतर काढण्यात यश

## दीड महिन्यात वांबोरीत तिसरा बिबट्या जेरबंद

**वांबोरी : प्रतिनिधी**

**राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे दीड महिन्यांपूर्वी लोकवस्तीत वावर असलेले दोन बिबटे जेरबंद करण्यात आले होते. त्यानंतर रविवारी तिसरा बिबट्या जेरबंद करण्यात आला.**

भक्ष्याच्या शोधात बिबट्या विहिरीत पडला होता. वनविभागाच्या पथकाने पाच तास प्रयत्न केल्यानंतर, बिबट्याला विहिरीबाहेर काढून जेरबंद करण्यात आले. हा बिबट्या वैद्यकीय तपासणीसाठी डिग्रस नर्सरीत रवाना करण्यात आला. दीड महिन्यांपूर्वी दोन बिबट्यांचा वावर वांबोरीत जवरे वस्ती



येथे आढळून आला होता. त्यावेळी वनविभागाने पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद केले होते. परंतु, वेळोवेळी गाव परिसरात अनेकदा बिबट्याचे दर्शन होत आहे.

शनिवारी मध्यरात्रीनंतर भक्ष्याच्या शोधात असलेला पाच महिन्यांचा बिबट्या, कात्रडरोडवरील जगन्नाथ रंगनाथ सत्रे यांच्या विहिरीत पडला. रविवारी सकाळी सत्रे, विहिरीकडे गेले असता बिबट्याची गुरगुर ऐकल्यानंतर विहिरीत बिबट्या पडल्याचे आढळून आले. त्यानंतर वनक्षेत्रपाल युवराज पाचारणे, वनपाल उर्वरित पान ४ वांबोरी येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याला पाच तासांनंतर बाहेर काढण्यात आले. पिंजऱ्यात जेरबंद झाल्यानंतर हा बिबट्या गुरगुरत होता.

# आमदार लहामटेंचा घाटघर आश्रमशाळेत मुक्काम

## विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या

**अकोले : प्रतिनिधी**

**'संवाद चिमुकल्यांशी' अभियान अंतर्गत अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी घाटघर येथील आश्रमशाळा व वसतिगृहात नुकताच मुक्काम करून त्यांच्याशी संवाद साधत समस्या देखील जाणून घेतल्या.**



राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या संकल्पनेतून आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहात 'संवाद चिमुकल्यांशी' अभियान सुरू करण्यात आलेले आहे. या अभियाना अंतर्गत आमदार डॉ. लहामटे यांनी घाटघर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. याचबरोबर त्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेत तेथील सुविधांची पाहणी केली.

विशेष म्हणजे त्यांच्यासोबत ते खात असलेल्या जेवणाचा आस्वादही घेतला आणि त्यांच्यासोबतच मुक्काम केला. आश्रमशाळेच्या दर्जेदार इमारतीसोबतच शैक्षणिक गुणवत्तेने परिपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करून आश्रमशाळेबद्दल असलेला विश्वास अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा विश्वासही आमदार लहामटे यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

# शिव्या आणि ओव्या



शिवी आणि ओवी. मराठी भाषेतील सुंदर आणि अर्थसंपृक्त किंवा अर्थभरित शब्द. या दोन्ही शब्दांत क्रियापदाचा एकेक धातू दडलेला आहे. शिवीमध्ये शिव् तर ओवीमध्ये ओव् धातू आहे. शिव+शिवणे. तसेच ओव+ओवणे. ओवणे आणि शिवणे. दोन्ही क्रियापदांचा संबंध धाग्याशी येतो. हा धागा नात्यांचा. सामाजिक संबंधांचा. नाती टिकविण्याचा. सामाजिक संबंध जोपासण्याचा.

शिवीला समाजात मान नसतो. त्यात नकारात्मकता असते. नात्यांचा, सामाजिक संबंधांचा विच्छेद असतो. नातेसंबंधांचे उसवणे असते. खरेच आहे ते. पण शिव्या आणि ओव्या या वाक्प्रचारातील शिवी शब्द त्या नकारात्मक वर्गातला नाही. लहान मुलगा खोडकर असतो. आपल्या आईचे ऐकत नाही. पावसात भिजू नकोस. सर्दी होईल. असे ती त्याला परोपरीने सांगते. तरी मुलगा पावसात भिजायला निघतो. तेव्हा आई त्याला रागावून शिवी देते, मर मेल्या. भीज एकदाचा पावसात. होऊ दे सर्दीपडसे. मी तुला डॉक्टरकडे नेणार नाही. हा नात्याचा किंवा सामाजिक संबंधाचा विच्छेद नव्हे. इथे रूढ अर्थाने मर मेल्या ही शिवी नव्हे. आईमुलाचा संबंध जोपासण्याचा, जोडण्याचा वा शिवण्याचा तो एक सामाजिक बंध आहे. त्यात नकारात्मकता नाही. खोटा खोटा राग व्यक्त करण्याचा तो रूढ असा बंध आहे. प्रेमातल्या अनुरागासारखा. हा प्रेमयुक्त राग असतो.

काही वेळेला मात्र खरोखरच शिव्या मोजल्या जातात. त्या शिव्या ऐकवत नाही. पण त्यांत मोठे काव्य असते. एक उदाहरणच पाहू.

अहो पुष्कळ पोटचा मुलगा आहे. पण माझं ऐकत नाही. काय करू मी?

मग तुझी ....... झोडून घे आता!

हे अश्रवणीय असले तरी यात काव्यमयता आहे, एवढे नक्कीच.

उर्दू भाषेत सुंदर सुंदर (?) शिव्या आहेत असे वाटते. उर्दू भाषेतल्या गोडव्याचे गुणगान गाताना एका लेखकाचे वाक्य वाचनात आले होते. उर्दू में गाली भी भली लगे, असे ते वाक्य होते. विशेषतः उर्दू भाषेतून भांडणाऱ्या महिलांचा संवाद ऐकावा, असेही त्या लेखकाने सुचविले होते.

शिव्या सभ्य समाजाचे लक्षण नाही. असे समजले जाते. हे सत्य मानले तरी एक समस्या उरतेच . भाषेला किंवा भाषा मातेला आपली सुशब्द आणि कुशब्द ही संतान सारखीच असते. दोन्हींवर तिची सारखीच माया असते. तरी एकूण समाजाला ती नापसंत असते, एवढे खरे. म्हणूनच मी म्हणतो असतो, फाटलेल्या नात्यांना शिवण्यासाठी, शारिरीक हिंसेपासून, मारहाणीपासून वाचण्यासाठी, शिव्या हा अखेरचा उपाय आहे. म्हणून या मार्गापासून आपण शक्य तो दूर राहिलेलेच बरे.

एखाद्याच्या ओव्या गाणे म्हणजे त्याची स्तुती करणे. स्तुती सगळ्यांनाच आवडते. हाही नातेसंबंध किंवा सामाजिक संबंध टिकविण्याचा प्रभावी उपाय आहे. पण त्यात साहजिकता असावी. छद्मीपणा नसावा, ढोंग नसावे. एवढीच अपेक्षा असते. पूर्वी मी याच दैनिकात पहिली माझी ओवी गं मथळ्याचा लोकसाहित्यावर एक लेख लिहिला होता. या जात्यावरील ओवीत भाऊराया, आई, बाप, सासर, माहेर अशा सामाजिक नात्यांची सुंदर वीण असते. संतवाङ्मयातील तुकारामांसारख्यांच्या अभंगातील किंवा ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथातील ओव्याही वेगळे काय सांगतात?

परस्पर नात्यांची, सामाजिक संबंधांची वीण उसू नये, फाटू नये. ती टिकून रहावी. म्हणून प्रत्येक भाषेत शिव्या आणि ओव्या सापडतील, हे मात्र खरे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### डॉ.सुरेश शिंदेंची भूमिका असणारा 'साबर बोंड' सातासमुद्रापार !

व अवचित वाडी या वेबसिरीज मध्ये काम करणारे तसेच सिनेमासृष्टीत काम करणारे अष्टपैलू कलाकार डॉ. सुरेश शिंदे यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ज्येष्ठ कलाकार मोठ्या पडद्याच्या माध्यमातून विदेशात पोहोचले आहे. संपूर्ण माळकुप, भाळवणीकरांसाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. सर्वसामान्य कुटुंबातील कलाकार आज मोठ्या पडद्यावर काम करू शकतो. या सन्मानाबद्दल डॉ. सुरेश शिंदे यांचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

सनडान्स फिल्म फेस्टिव्हल २०२५ उटाहमधील पार्क सिटी येथे सुरू होत आहे, ज्यामध्ये ११ दिवसांत ९० चित्रपट प्रदर्शित केले जाणार आहेत, ज्यात समयोचित कथा, नामवंत सेलिब्रिटी आणि उदयोन्मुख प्रतिभा यांचा समावेश असेल, त्यात माळकूपच्या डॉ. सुरेश शिंदे यांची प्रतिभा आता सातासमुद्रापार पोहोचली आहे. या आंतरराष्ट्रीय सन्मानाबद्दल डॉ. सुरेश शिंदे यांच्यावर सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**जगभरातील चित्रपटांशी स्पर्धा**

साबर बोंडं सनडान्स फिल्म फेस्टिवलच्या वर्ल्ड सिनेमा ड्रामॅटिक कॉम्पीटिशनमध्ये स्पर्धा करणारा भारतासोबत दक्षिण आशियामधील एकमेव चित्रपट ठरला आहे. हा चित्रपट यंदा फेस्टिवलसाठी मिळालेल्या जगभरातील हजारो सबमिशन्समधून निवडण्यात आलेल्या चित्रपटांसोबत स्पर्धा करणार आहे.

**हा अवर्णनीय आनंद !**

साबरबोंड चित्रपटाला मिळालेले यश आणि साकारलेली भूमिका आपल्या कला प्रवासातील मैलाचा दगड ठरला आहे. भारतातील एकमेव अवॉर्ड विनर सिनेमा.मराठी चित्रपटाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडतंय. म्हणजे सोने पे सुहाना हा आनंद अवर्णनीय आहे. डॉ.सुरेश शिंदे अभिनेता ,साबरबोंड

### १५ फेब्रुवारीपासून कुकडीचे आवर्तन - आ. काशिनाथ दाते

पार्श्वभुमीवर पिकांना पाण्याची जास्त आवष्यकता असून पाणी न मिळाल्यास शेतांमधील उभी पिके जळून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून आ.काशिनाथ दाते यांनी आवर्तनाआगोदर पाच दिवस पाणी सोडण्याची मागणी शिर्डी येथे सहकार परिषदेमध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांकडे केली होती.

आ. दाते यांच्या या मागणीची मंत्री विखे यांनी तात्काळ दखल घेऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी कुकडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता धुमाळ यांच्याशी संपर्क करून १५ फेब्रुवारी रोजी आवर्तन सोडण्याचे आदेश दिले. पाच दिवस अगोदर आवर्तन सोडण्यात येणार असल्याने शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. निघोज परिसरातील शेतकऱ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे तसेच आमदार काशिनाथ दाते यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### सेवानिवृत्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणार - खासदार नीलेश लंके

कर्मचारी संघटनेच्या वतीने एसटीची प्रतिकृती देऊन खासदार लंके यांचा सत्कार केला.राज्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करावे अशी गळही राज्य कार्यकारिणीच्या वतीने खासदार लंके यांना घालण्यात आली.

राज्य परिवहन सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे,एम.के.शिंदे,भिमा पठारे,सुरेश औटी,दत्ता कोरडे आबसाहेब भोंडवे यावेळी उपस्थित होते. सार्वजनिक उपक्रम, सहकारी बँका, संघटीत क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्यासाठी केंद्र सरकारने १९९५ साली इपीएस निवृत्ती वेतन योजनेची घोषणा केली.मात्र एसटीसह विविध क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही.त्यासाठी खासदार लंके यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा.सन २०१६ ते २० या कालावधीत राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापनाने, कामगारांच्या वेतनवाढी संदर्भातील करार केला नाही.करार न झाल्याने तसेच सन २०२० ते २४ या कालावधीत वेतनवाढीचा करार होऊनही वेतनवाढ न मिळाल्याने या कालावधीत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तब्बल १५० कोटी रुपयांची थकबाकी राज्य परिवहन महामंडळाकडे, पर्यायाने राज्य सरकारकडे आहे.थकबाकीची रक्कम कर्मचाऱ्यांना मिळावी.या प्रमुख मागण्यांसह वैद्यकीय खर्चाची रक्कम, शिल्लक रजेची रक्कम मिळावी यासह विविध मागण्या मार्गी लावण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी पाठपुरावा करावा असे साकडे निवृत कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घातले.

एकीकडे राज्य व केंद्र सरकारच्या थेट सेवेतील निवृत्त कर्मचाऱ्यांना भरघोस निवृती वेतन मिळते.त्यांना ते मिळायलाच हवे.मात्र इतर क्षेत्रातील निवृत्त कर्मचाऱ्यांनाही योग्य प्रमाणात निवृत्ती वेतन मिळालेच पाहिजे.त्यासाठी केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयाकडे

तसेच राज्य सरकारशी संबंधित मागण्यांसंदर्भात आपण सातत्याने पाठपुरावा करू.निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही अशी निःसंदिग्ध ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली.

संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची खा.लंकेना गळ राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेचे ५२ हजार सभासद आहेत.दिवसेंदिवस सभासद संख्येत वाढ होत आहे.संघटनेचे अध्यक्षपद खासदार गिरीश बापट यांच्याकडे होते.मात्र बापट यांच्या निधनामुळे अध्यक्षपद रिक्त आहे.संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आपण स्वीकारावी अशी गळ राज्य कार्यकारिणीच्या वतीने,संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे यांनी खासदार नीलेश लंके यांना घातली.कार्यकारिणीशी चर्चा करून याबाबत आऐ निर्णय घेवू.असे आश्वासन खासदार लंके यांनी दिले.

# पारनेर मॅरेथॉनमध्ये धावले ४५४ स्पर्धक !

## । अतुल बरडे, धनश्री झंजाड, संगिता कोळपे, समर्थ लोंढे, प्रिया गुळवे, सौम्य शेट्टी, प्रणव रणदिवे विजेते । नागेश्वर मित्र मंडळाच्या वतीने आयोजन



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर येथील नागेश्वर मित्र मंडळ आयोजित २४ व्या राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धेत अतुल बरडे, नाशिक, धनश्री झंजाड, समर्थ लोंढे किसान पारनेर, संगिता कोळपे - प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी, सौम्य शेट्टी, हंगा, प्रिया गुळवे, अळकुटी, प्रणव रणदिवे,पानोली, यांनी,विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत तब्बल ४५४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. किसान इंटरनॅशनल स्कूल पारनेर व आश्रमशाळा ढवळपुरीच्या खेळाडूंनी सर्वाधिक बक्षिसे मिळवून वर्चस्व मिळविले.**

शुक्रवारी रात्री पासूनच राज्यस्तरीय पारनेर मॅरेथॉन स्पर्धेसाठी खेळाडू पारनेर शहरात दाखल झाले होते. शनिवारी सकाळी सात वाजता छत्रपती संभाजी महाराज चौक अळकुटी रस्ता येथून स्पर्धा प्रारंभ करण्यात आली. पारनेर महाविद्यालयचे प्राचार्य डॉ रंगनाथ आहेर, एनसीसीचे प्रमुख प्रा.भरत डगळे, सेनापती बापट विद्यालयाचे प्राचार्य संतोष कुलकर्णी, नगरसेवक अशोक चेडे, भिकाजी जगदाळे, क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब होळकर, क्रीडा संचालक प्रा संजय गायकवाड, शिक्षक लतिफ राजे, ऋषीकेश औटी यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धा सुरू करण्यात आली. तर पोलिस निरीक्षक समीर बारवकर, अर्जुन भालेकर, डॉ बाळासाहेब कावरे, दत्तात्रय अंबुले, प्रसिद्ध सी.ए.कौस्तुभ काकडे, विजय डोळ यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

पारनेर पोलिस व पारनेर महाविद्यालयचे एनसीसी पथकाने यशस्वी सहकार्य केले. १०८ रुग्णवाहिकेचे डॉ.नरेंद्र मुळे, शिवाजी औटी यांनी आरोग्य सुविधा दिली. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मंडळाचे प्रमुख नजीर तांबोळी, धीरज महांडुळे, तेजस औटी, आकाश शेळके, शेखर हांडे, गणेश कावरे, प्रविण गणाचार्य, समीर शेख, डॉ नरेंद्र मुळे, शिवाजी औटी, कल्याण थोरात, हर्षवर्धन औटी, सतिष म्हस्के, राजेंद्र म्हस्के, वैभव पठारे, राहुल सोंडकर, प्रा तुषार ठुबे, अशोक गायकवाड, ईश्वर क्षीरसागर, रमेश औटी, प्रमोद गोळे आदींनी प्रयत्न केले.

**स्पर्धेचा निकाल-पहिली ते चौथी गट (मुली)**

धनश्री झंजाड, आदिती साळवे- ( प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी), खुशी चेडे, सेजल पुजारी (किसान पारनेर) जया ठोंबरे व शितल घुले (प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी)

(मुले) - समर्थ लोंढे, करण बोरूडे, आराध्य पाटील सर्व (किसान पारनेर) सार्थक जाधव अळकुटी, मयुरेश शेळके, रोहीत बांगर,बांगरवाडी, बिरा झिटे (प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी) सार्थक लोंढे (किसान पारनेर)

**पाचवी ते सातवी (मुली)-**

संगीता कोळपे (प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी) प्रांजल जाधव (साईनाथ अळकुटी) साक्षी लव्हाटे व माया शिंगटे (प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी) श्रेया गाजरे, (राळेगणसिद्धी) गौरी पोखरकर, (साईनाथ अळकुटी) वैष्णवी थोरात, (मुलीकादेवी, निघोज)

मुले -सौम्य शेट्टी (स्टेला मारीस हंगा) साहील ठुबे व युवराज ठुबे, (कान्हूरपठार) सोहम भोसले, (राळेगणसिद्धी) महेश शिंगटे व आदेश चव्हाण (प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी) सुजय ठुबे (कान्हूरपठार)

**आठवी ते दहावी (मुली)**

प्रिया गुळवे, समृद्धी जाधव, हेमल पवार, प्रीती खामकर सर्व (साईनाथ अळकुटी) कार्तिकी पठारे (राळेगणसिद्धी) सोनाली तांबे व खुशी डोमाळे (माध्यमिक आश्रमशाळा ढवळपुरी) श्वेता चत्तर, (जिजामाता पारनेर)

मुले -प्रणव रणदिवे, (पानोली) गौरव गाढे (माध्यमिक आश्रमशाळा ढवळपुरी) शुभंम पांढरे व सुजीत बोरूडे (न्यु इंग्लिश स्कूल पारनेर) गौरव बोरूडे, (नेताजी पानोली) कुणाल धुमाळ, (टाकळी ढोकेश्वर) अनुप पुंडे (अळकुटी) श्रेयस जाधव, (टाकळी ढोकेश्वर)

**खुला गट**

अतुल नरडे, (नाशिक), कृष्णा गायखे, (नगर), नवनाथ बाचकर, (पळशी), आयाज पठाण, (अळकुटी), अक्षय जगदाळे, (हत्तलखिंडी), मयुर आवारी, (रांधे) कबीर बेरड, (निंबोडी)

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या यशाचे इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक आयुक्त विनोद लोंढे, धन्वंतरी फौंडेशनचे अध्यक्ष शाहिद काझी, सचिव रेहान काझी, ढवळपुरीच्या सरपंच सौ नंदाताई गावडे, उपसरपंच बबनराव पवार, सेवा सोसायटीचे चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, दुर्गेश्वरी दूध संस्थेचे चेअरमन सुखदेव चितळकर, मुख्याध्यापक संदीप महांडुळे, मुख्याध्यापक बापूसाहेब रूपनर, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

### आश्रमशाळा ढवळपुरी व पारनेर मॅरेथॉन

**पारनेर राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा मागील २४ वर्षांपासून घेण्यात येत असून या स्पर्धेमध्ये मागील १८ वर्षांपासून आश्रमशाळा ढवळपुरीचे विद्यार्थी सहभागी होत आहेत. प्रत्येक वर्षी आश्रमशाळा ढवळपुरीचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात यश मिळवून अनेक बक्षीसांवर आपले नाव कोरत आहेत. त्यात प्रामुख्याने प्राथमिक आश्रमशाळेच्या क्रीडा विभागाचे प्रमुख शिक्षक लतिफ राजे यांच्या मार्गदर्शनात इयत्ता पहिली ते सातवीचे विद्यार्थी दोन गटात सहभागी होऊन अक्षरशः बक्षिसांची लयलूट करत आहेत. तसेच माध्यमिक आश्रमशाळेचे राधुजी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी यश मिळवित आहेत. या स्पर्धेमुळे आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये मॅरेथॉन स्पर्धेबद्दल आवड निर्माण झाली असून त्याचा त्यांना भविष्यात फायदा होत आहे.**

# गायन स्पर्धेत स्वरांजली नं.१ !

## डॉ. भास्करराव शिरोळे यांच्याकडून सन्मान

**निघोज : प्रतिनिधी**

**येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी स्वरांजली रोहन उनवणे हिने विविध गुणदर्शन स्पर्धेत पारनेर तालुक्यात गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पंचायत समितीचे मा. सदस्य डॉ.भास्करराव शिरोळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**



यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे, मंदा उनवणे, रोहन उनवणे,सरला उनवणे व रेवा उनवणे हे उपस्थित होते. स्वरांजली ही तालुक्यात गायन स्पर्धेत पहिली आली. तर जिल्हास्तरीय स्पर्धेत तिला गाण्याची संधी मिळाली.केंद्रप्रमुख बाचकर सर, मुख्याध्यापक कैलास शिंदे सर, ज्येष्ठ शिक्षक सुभाष महाराज मगर सर, काळे सर, काळोखे सर, शिक्षिका दिघे मॅडम, सालके मॅडम आदींचे मार्गदर्शन लाभले आहे.

डॉ.भास्करराव शिरोळे यावेळी म्हणाले की,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची गुणवत्ता कौतुकास्पद असून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना या शाळा अतिशय चांगले शिक्षण देत आहे.यामुळे शैक्षणिक संस्कृतीला चालना मिळाली आहे. स्वरांजली हिने गोड आवाजात गवळण म्हणून धार्मिक संस्कृती जोपासली असून तीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. यावेळी दत्तात्रय उनवणे यांनी डॉ.भास्करराव शिरोळे यांना धन्यवाद देत आभार व्यक्त केले.

### कलागुणांना प्रोत्साहन !

**स्वरांजलीला बालपणापासूनच कलागुणांची आवड आहे. तिच्यातील कला गुणांची पारख करून शिक्षकांनीही तिच्या कलागुणांना प्रोत्साहन दिल्यानेच तिने या स्पर्धेत क्रमांक पटकविला आहे.तिच्या यशात शिक्षक वर्गांचाही मोठा वाटा आहे.**

**दत्ताजी उनवणे**
कार्याध्यक्ष,पारनेर तालुका पत्रकार संघ

# मॅरेथॉन स्पर्धेत आदिती साळवे द्वितीय

## खा.नीलेश लंके यांच्याकडून कौतुक

**ढवळपुरी : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनात पारनेर येथील नागेश्वर मित्र मंडळ आयोजित २५ व्या पारनेर राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत आश्रमशाळा ढवळपुरीची कु. अदिती संदिप साळवे हिने दुसरा क्रमांक पटकावत घवघवीत यश मिळवले. तिच्या या यशाचे खासदार नीलेश लंके यांनी कौतुक केले.**



पारनेर राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरीतील इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी कु. अदिती संदीप साळवे हिने पहिली ते चौथी गटामध्ये द्वितीय क्रमांक मिळवून यश मिळवले. शेकडो विद्यार्थ्यांमध्ये अदितीने घवघवीत यश मिळविले. शिक्षक लतिफ राजे व वर्गशिक्षक सूरजसिंग वाणी यांच्या मार्गदर्शनात तिने सराव करून यशाला गवसणी घालीत एक किलोमीटर अंतराची हि स्पर्धा यशस्वीपणे पार पाडली.

तिच्या या यशाचे ढवळपुरीच्या सरपंच नंदाताई भागाजी गावडे, उपसरपंच बबनराव पवार, चेअरमन भागाजी गावडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मित्र मंडळाचे अध्यक्ष तुषार साळवे, ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले.

# सुपा परिसरातील अवैध व्यवसाय बंद करा

## योगेश कुलथे यांची मागणी



**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोठया प्रमाणावर अवैध व्यवसाय सुरू असून ते बंद करण्याची मागणी भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

यासंदर्भात कुलथे यांनी निवेदनात नमुद केले आहे की, नवीन म्हसणे फाटा औद्योगिक वसाहत तसेच नगर-पुणे महामार्गावरील जातेगांव फाटा येथील दोन हॉटेलांमध्ये मोठया प्रमाणावर वेश्या व्यवसाय सुरू आहे. महामार्गालगत असणाऱ्या हॉटेलमध्ये रात्रीच्या वेळी येणाऱ्या मालवाहू वाहनांमधूनअवैध मार्गाने सळई तसेच विविध प्रकारचे लोखंड, भंगाराची तस्करी करण्यात येते. महामार्गालगतच्या हॉटेलमध्ये, ढाबे व टपऱ्यांवर दारू, गुटखा, गांजा विक्री असे अवैध व्यवसाय सुरू असल्याचे कुलथे यांचे म्हणणे आहे.

सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका व इतर अवैध व्यवसाय सुरु असून म्हसणे फाटा येथील विस्तारीत औद्योगिक वसाहत व जुन्या वसाहतीसह वाघुंडे येथे मोठया प्रमाणावर गॅस सिलेंडरमधून ५ किलोच्या छोटया टाक्यांमध्ये अनधिकृतपणे रहदारीच्या ठिकाणी राजरोसपणे गॅस भरून देण्यात येतो. अशा व्यवसायांवर पोलीसांकडे कारवाई होणे अपेक्षीत आहे. मात्र तसे होताना दिसत नसल्याचे कुलथे यांनी निवेदनात नमुद केले आहे. नव्याने रूजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी अवैध व्यवसायांवर धडक कारवाई करण्याची मागणी कुलथे यांनी या निवेदनात केली आहे.

# दुर्गादेवी विद्यालयात ४५ वर्षांनी भरली शाळा!

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**ढवळपुरी : प्रतिनिधी**

**शाळेच्या नियमित वेळेमध्ये घंटा वाजली आणि वर्ग सुरू झाला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची हजेरी घेऊन शाळेला सुरूवात झाली. तब्बल ४५ वर्षांपूर्वीच्या आठवणींमध्ये रमून जात ढवळपुरीच्या श्री.दुर्गादेवी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आगळा वेगळा स्नेह मेळावा पार पाडला.**

सोशल मीडियाच्या माध्यमातून ४५ वर्षांपूर्वी एकत्र शिकलेले वर्गमित्र पुन्हा एकदा एकत्र येण्याचा योग आला. गावामधून वाजत गाजत फेरी काढण्यात येऊन माजी विद्यार्थी विद्यालयात पोहचले. माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात येऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. यावेळी सगाजी दाते, रभाजी झावरे, ई.के.दाते, डी.बी.तांबे, अशोक वाळेकर यांच्यासह विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख हे यावेळी उपस्थित होते.

वर्ग सुरू झाल्यानंतर शाळेत असताना नकोशी वाटणारी छडी शिक्षकांकडून आग्रहाने घेत माजी



विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे आशिर्वाद घेतले. शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थी व शिक्षकांनी या स्नेहमेळाव्याची रंगत वाढविली. प्राचार्य आदम शेख यांनी माजी विद्यार्थी व शिक्षकांचे स्वागत केले.

विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय करून देत कौटूंबिक माहितीचे आदान प्रदान केले. सर्वांचे सुखाचे संसार, मुले, मुली शिक्षण घेउन उच्च विद्याविभूषित होऊन नोकरीस असल्याने सर्वांनी समाधानाची भावना व्यक्त केली.

वसतीगृहातील विद्यार्थ्यांसमावेत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रम करण्याचा सल्ला देण्यात आला.

विनोद पोखरणा यांनी सुत्रसंचलन केले तर उपसरपंच बबनराव पवार यांनी आभार मानले. यावेळी विद्यालयाचे शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपास्थित होते.

### स्टेजच्या छतासाठी दिड लाखांची मदत

**ज्या विद्यालयाने आपणास घडविले त्या विद्यालयाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या व्यासपीठासाठी छत बांधून देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी येणार दिड लाख रूपयांचा खर्च माजी विद्यार्थी देणार आहेत.**

# एनएमएमएस परीक्षेत मुलिकादेवीचे १८ विद्यार्थी पात्र

## आर्थिक दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती परिक्षा



**निघोज : प्रतिनिधी**

**आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी घेण्यात येणाऱ्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परिक्षेत निघोज येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री मुलिकादेवी विद्यालयाचे १८ विद्यार्थी पात्र ठरल्याची माहिती विद्यालयाच्या प्राचार्या मनिषा जगदाळे, उपमुख्याध्यापक कचरू शिंदे पर्यवेक्षक संतोष इंगळे यांनी दिली.**

पात्र विद्यार्थ्यांना छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती इयत्ता नववी ते बारावीपर्यंत प्रतिवर्ष नउ हजार रूपये प्रति विद्यार्थी प्राप्त होते. यशस्वी विद्यार्थ्यांना अजित सांगळे, सुनील औटी, शिवाजी गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, मा. अध्यक्ष नंदकुमार झावरे, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी, कार्यकारणी सदस्य डॉ. भाउसाहेब खिलारी, संस्थेचे सर्व विश्वस्त,सदस्य यांनी कौतुक केले. विद्यालयाच्या प्राचार्या मनिषा जगदाळे, उपप्राचार्य कचरू शिंदे, पर्यवेक्षक संतोष इंगळे सर्व शिक्षक व सेवक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### यशस्वी विद्यार्थी

**महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आयोजित परिक्षेत विद्यालयातील प्रांजल दिगंबर लाळगे,राधा नीलेश झावरे, लावण्या गणेश भुकन, तेजल रोहिदास काळे, कार्तिकी संतोष पठारे, तनुजा शशिकांत कवाद, यश गणेश खाडदे, रागिनी अजय गौड, अर्णवी संतोष चेमटे, ईश्वरी सुखदेव रासकर, सायली भिमराज शिंदे, यश भुजंग भाकरे, तनया मच्छिंद्र गुंड, आयान रमजान पठाण, श्रेया रमेश घोगरे, ईश्वरी मच्छिंद्र लाळगे, सानवी गोकुळ ढुमणे, अनुष्का विजय लामखडे यांनी उज्वल यश संपादन केले.**

# बाळानंद स्वामी विद्यालयाची गुणवत्ता कौतुकास्पद

## शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्याकडून गौरव

**सुपा : प्रतिनिधी**

**वाघुंडे खुर्द येथील श्री. बाळानंद स्वामी विद्यालयात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कौतुकास्पद असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी सांगितले.**



राज्य शासनाच्या गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षणासाठी प्रभावी सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत नगरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी शनिवारी श्री बाळानंद स्वामी विद्यालयास भेट दिली. शाळेची तपासणी करून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, अभ्यासाविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. स्वत:मधील क्षमता ओळखून यश मिळविण्यासाठी कसे प्रयत्न करावे याचे उदाहरण देउन त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत बोर्ड परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यालयाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष संदीप मगर यांच्या हस्ते माध्यमिक शिक्षणाधिकारी कडूस यांचा शाल तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची मुर्ती भेट देऊन सत्कार, सन्मान करण्यात आला. माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी विद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल श्री भैरवनाथ विद्या प्रसारक शिक्षण संस्थेच्या वतीने तसेच विद्यालयाच्या वतीने अध्यक्ष संदीप मगर यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

### मिनी सायन्स लॅब

**संस्था पदाधिकाऱ्यांचे अथक परिश्रम व खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून कल्पतरू फाउंडेशन या कंपनीच्या सीएसआर निधीमधून विद्यालयास प्राप्त १२ लाख रूपयांच्या मदतीतून मिनी सायन्स लॅबची उभारणी करण्यात आली आहे. लॅबची पाहणी करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुसज्ज अशी अत्याधुनिक लॅब उपलब्ध कयन दिल्याबद्दल तसेच शाळेच्या गुणवत्तेबद्दल श्री भैरवनाथ विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष संदीप मगर यांचे शिक्षणाधिकारी कडूस यांनी कौतुक केले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com